पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक),
जा.क्र.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/आरटीई/ स्वयंअर्थसहा/ 817 /19
पुणे । दिनांक -11/6/2019

प्रति

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
ग्लोरिया पेडीक्लब व एज्युकेशन, भारती विद्यापीठ पाणे, क.जा.क्र पुणे संचलित आर्यन्स स्कूल, आर्यन्स व्हॅली, भिलारेवाडी, ता.हवेली,जि.पुणे

विषय:- सन 2013-14 चा शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यार्थ्यांना शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत

संदर्भ :- 1. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.1, 6 दि.24.1.2013
2. शासन निर्णय क्र.संकिर्ण-2018/प्र.क्र.30/प्राथ/एसएस-2, दि.19.10.2018
3. मा.उप शिक्षण संचालक,पुणे विभाग पुणे यांचे क.जा.क्र.उशिसं/प्राथ/का.१/सी/3890/ 2018-19, दिनांक 31.5.2019

उपरोक्त संदर्भीय क्रमांक ३ अन्वये प्राप्त प्रस्तावानुसार, आपल्या संस्थेने नवीन शाळा सुरू करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या अनुषंगाने आपल्या संस्थेच्या प्रस्ताव क्र. 2 च्या अनुषंगाने स्वयंअर्थसहाय्यित खालीलप्रमाणे नवीन अटी व शर्तींवर विद्यार्थ्यांना शाळा प्राथमिक ते उच्चप्राथमिक इ.१ ली ते इ. ८ वी प्रथम सत्रापासून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	शाळेचे नाव व पूर्ण पत्ता	जागेवर भरविण्यात येणाऱ्या शाळेचे नाव व पूर्ण पत्ता	माध्यम	शाळेचा प्रकार नवीन शाळा/ वर्गवाढ	मान्यता वर्ग / इयत्ता	शेरा
1	3	4	5	6	7	9
1	ग्लोरिया पेडीक्लब व एज्युकेशन, भारती विद्यापीठ अंतर्गत कार्यरत पुणे	आर्यन्स स्कूल, आर्यन्स व्हॅली, भिलारेवाडी, ता.हवेली,जि.पुणे	इंग्रजी	नवीन शाळा इ.१ ली ते इ. ४ थी	प्राथमिक	

अटी व शर्ती

1. सदरचे वर्ग परवानगी देण्यात आलेल्या माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये अन्यथात्व कागदपत्रे आढळून आल्यास परवानगी रद्द करण्यात येईल.
2. शाळा सुरू करण्यासाठी तसेच शैक्षणिक दृष्ट्या आवश्यक असलेली पायाभूत सुविधा व इतर सर्व बाबींची पूर्तता संस्थेने स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. तसेच शाळा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व ना हरकत दाखले संस्थेने स्वतः घेणे बंधनकारक राहील.
3. सदर संस्थेने शाळेसाठी जी जागा दाखविली आहे त्याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास, त्यास संस्थेचे संस्थाचालक हे स्वतः जबाबदार राहतील. तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
4. शिक्षण निरीक्षक (प्राथमिक) पुणे यांचे पत्र क्र.जिशिसं/प्राथ/आरटीई/ 1216/एसएस-2, दि.19.10.2018 यातील अटी व शर्तींनुसार संस्था क्र.2 ने कार्यरत असलेल्या शाळेत विद्यार्थी प्रवेश न देण्याबाबत दक्षता घेणेबाबत कळविले आहे.
5. शाळा इमारतीच्या दर्शनी भागावर शाळा व जागेच्या मालकीबाबत सविस्तर स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळा असा फलक लावणे बाबत सर्व पालकांसाठी दर्शनिय ठिकाणी फलक लावणे बंधनकारक राहील.
6. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
7. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील. तसेच सदर शाळेस मान्यता दिलेल्या शाळांना स्वयं अर्थसहाय्यित वर्गवाढ स्वतंत्र आदेश करणे आवश्यक राहील.
8. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व नियम व शासन निर्णयांचे पालन करणे अशा शाळांवर बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-
1) मा. अपर आयुक्त, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पुणे विभाग, पुणे-1
2) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1
3) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1